प्रेस नोट ता. २३/०३/२०१९

## हडपसर परिसरात वेश्याव्यवसाय करुन घेणाऱ्या इसमांना हडपसर पोलीसांकडून अटक

पुणे शहरातील गुन्हयास प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील गुन्हयास आळा घालण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

हडपसर पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी हे गुन्हयांचा तपास करीत असताना वपोनि सुनिल तांबे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हडपसर पोलीस स्टेशनकडील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी शिवम लॉज माळवाडी हडपसर या ठिकाणी बनावट गिऱ्हाईक पाठवुन माहिती खातरजमा करुन लॉजवर छापा टाकून दोन पिडीत महिला यांची सुटका केली.

दोन पिडीत महिलांना पैश्याचे अमिष दाखवुन जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करुन घेणारे इसम नामे १) प्रसाद वसंत हेगडे वय ४० वर्षे रा. मोरवाडी सेंन्ट्रल मॉलच्या मागे, श्रध्दा हेरिटेज पिंपरी पुणे २) मारुती मरिबा मोरे वय २८ वर्षे रा. सानेगुरुजी हॉस्पीटल जवळ हडपसर पुणे यांना पकडून त्यांचेवर पिटा ॲक्ट प्रमाणे कारवाई करुन त्यांचेविरोधात हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. २७५/२०१९ पिटा ॲक्ट कलम ३, ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल केला व त्या दोन इसमांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, संहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचे सुचनानुसार पोलीस निरीक्षक (गुन्हे), शिवाजी शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उप निरीक्षक सुप्रिया गावडे, पो. हवा. ३८६८ संतप औचरे, पो. हवा.८७४ साहेबराव सोनवणे, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. १४५१ संतोष जाचक, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. ना. ५८५३ गणेश दळवी, पो. शि. ७२१२ गोविंद चिवळे, महिला पोलीस शिपाई रुपाली टेंगले यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
हडपसर पोलीस स्टेशन, पुणे